दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
dainiklokaarambh@gmail.com
बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | शनिवार १८ ऑक्टोबर २०२५ | अंक २९५ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

**आजचा दिनविशेष**
१९०६ : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना केली.

SUN Tourism International Pvt. Ltd. Since 2007 · All Tours घर से घर तक · दिल से दिल तक · 1st Time in Travel Industry · www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# भुजबळांची अक्कल दाढ पडली, बुद्धी:; जरांगे पाटील यांचे भुजबळांना प्रत्युत्तर

ओबीसी नेत्यांनी आज मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली बीड येथे महाएल्गार सभा आयोजित करीत मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे यांना आव्हान दिले. या सभेत मंत्री छगन भुजबळ यांनी मराठ्यांना आमच्या ओबीसींच्या बोकांडी बसवण्याचा प्रयत्न का केला जात आहे असा सवाल केला. छगन भुजबल यांनी मराठा आंदोलक नेते जरांगे पाटील यांचा 'दरिंदे पाटील' असा उल्लेख करीत त्यांच्या मोठी टीका केली आहे. यावर आता जरांगे पाटील आपली प्रतिक्रीया व्यक्त केली आहे.

ओबीसी समाजाच्या एल्गार सभेनंतर बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, हे बीडमध्ये येऊन दहशत निर्माण करीत आहेत, आता मराठ्यांना आपली ताकद दाखववी लागणार आहे. आम्ही तर कोणच्याही असल्या दबावाला भितही नाही.मराठ्यांनाही आपल्या लेकरांचे भवितव्य वाचवण्यासाठी यांना तोडीस तोड उत्तर द्यावेच लागणार आहे. बीडची ही पवित्र भूमी महाराष्ट्राचा दिशा दर्शक होऊ शकतो असेही जरांगे यावेळी म्हणाले. पण आम्ही ओबीसीतूनच आरक्षण घेणार

बीड जिल्ह्यातून दिशा देण्याची ताकद मराठ्यांना दाखवावी लागणार आहे. परंतू यांचे जे स्वप्न आहे मराठ्या भीती आणि दहशत दाखवण्याची आणि जातीय दंगली घडवून आणायच्या हे स्वप्न कधीच पूर्ण होऊ द्यायचे नाही. आपण सुद्धा यांना ताकद दाखवलीच



### तुझा रक्ताळलेला चष्मा नको

बीडचे मराठे एवढे कच्चे नाहीत तेवढे लक्षात ठेवा असा इशारा त्यांनी यावेळी दिला. धनंजय मुंडे यांनी जरांगे पाटील हे आपला परळीचा चष्मावाला असा उल्लेख करताय. त्यावर मुंडे यांनी आपला चष्मा द्यायला तयार असे सांगितले आहे असे विचारता जरांगे यांनी तुझा चष्मा कोणी मागितला. तो तुलाच ठेव, तुझ्या चष्म्याने काय केलेय हे लोकांनी बघितले आहे. तुझा रक्ताळलेला चष्मा पाहिजे. भुजबळ यांनी तुमचा दरिंदे पाटील असा उल्लेख केला आहे असे विचारता जरांगे पाटील म्हणाले की ते काहीही बरळतंय अक्कल दाढ पडलीय त्याची. घुरट सगळीकडे वास दरवळत हिंडतंय तसं भुजबळ यांचे झाले आहे. आणि स्वत:च्या चक्रव्युहात ओबीसी नेत्यांना घेऊन त्याचा ते देव्हारा करु लागले आहे. तुम्ही किती दडपण आणायचा प्रयत्न करा पण आम्ही ओबीसीतूनच आरक्षण घेणार असा दावा जरांगे पाटील यांनी यावेळी केला.

## आरोग्य कर्मचारी महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची निवड.

बीड दि.१७(प्रतिनिधी):- आरोग्य कर्मचारी महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची निवड करण्यात आली. आरोग्य कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष विजय मोहरकर आणि राज्यउपाध्यक्ष शेळके व बाबासाहेब राख यांच्या विशेष उपस्थितीत आरोग्य कर्मचारी महासंघ बीड जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यासाठी बैठक घेण्यात आली. यात जिल्हाध्यक्षपदी अशोक



रामनाथ ठोसर यांची तर जिल्हा उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची सर्वांमध्ये निवड जाहीर करण्यात आली. यावेळी जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे, सुनिल गायकवाड, जीवन सानप, एस. पी कुलकर्णी, सुधाकर कुलकर्णी, राजेश कोलुगडे यांनी उपस्थित राहून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या कामाला गती देण्यासाठी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी ही निवड महत्त्वाची ठरणार आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अशोक ठोसर यांनी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी महासंघ कटीबद्ध राहील असे आश्वासन दिले याप्रसंगी महासंघाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

## बाजारात सोयाबीनला कवडीमोल भाव, व्यापारी शेतकऱ्यांना लुटू लागले शासकीय हमीभाव खरेदी केंद्र तात्काळ सुरु करा -उल्हास गिराम.

बीड: (प्रतिनिधी )जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. हाताशी आलेले पीक जमीनदोस्त होताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. ह्या अस्मानी संकटातून बाहेर येण्याचा प्रयत्न करत असतानाच बाजारात सोयाबीनची कवडीमोल भावात खरेदी करून शेतकऱ्यांना संकटात ढकलण्याचे पाप होत आहे. शेतकऱ्यांची लूट थांबविण्याकरता तात्काळ शासकीय खरेदी केंद्र सुरु करावीत, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केली आहे.



दिवाळीचा सण दोन दिवसांवर येऊन ठेपला असताना शेतकऱ्यांनी अतिवृष्टीत वाचवलेले सोयाबीन काढून बाजारात आणले आहे. सोयाबीन काढण्यासाठीही मोठा आर्थिक भुर्दंड शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे. सोयाबीन मजुरीचे दर ६०० ते ७०० रुपये झाले आहेत. मजूर मिळत नसल्याने हेक्टरी गुत्ते पद्धतीने काढण्यासाठी दयावे लागत आहे, त्यात दीडपटीने खर्च जास्त येत आहे. आपली आर्थिक गरज भागवण्यासाठी बाजारात विक्री शिवाय पर्याय राहिला नाही.

शासनही या लुटीच्या पाठीशी असल्याचे वाटत असून आजपर्यंत शासकीय दराचे सोयाबीन खरेदी केंद्र सुरू झालेले नाहीत. शेतकऱ्याच्या सोयाबीनला सध्या बाजारात ३५०० ते ३८०० रुपयांचा भाव मिळत असून शासकीय दर ५३३८ रुपये आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे.

महायुती सरकारने तात्काळ शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करावे, अन्यथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे.

## कपिलधारवाडीतील सर्पदर्शमुळे गायीचा मृत्यू; गावकऱ्यांची शासनाकडे मदतीची मागणी

बीड / प्रतिनिधी: बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी सुंदरराव बलभीम शिंदे यांच्या दुभत्या गायीचा सर्पदर्शनामुळे मृत्यू झाला असून, या घटनेने शिंदे कुटुंब आर्थिक संकटात सापडले आहे.गावातील भूस्खलन आणि घरांना तडे गेल्याने महावितरणकडून वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे गाव अंधारात बुडालेले असताना, सर्पाने गोठ्यात प्रवेश करून गायीवर हल्ला केल्याचे समजते.



शेतकरी शिंदे यांचे मुख्य उत्पन्न दुभत्या गायींच्या दुधावर अवलंबून आहे. त्यामुळे या गायीच्या मृत्यूमुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. याशिवाय वीज नसल्याने गुरांसाठी पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे.

गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, वीज व पाणी व्यवस्थेच्या अभावामुळे गुरे व शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. त्यांनी शासनाकडे तातडीने वीजपुरवठा सुरू करण्याची व गुराढोरांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. सध्या कपिलधारवाडीतील काही कुटुंबे स्थलांतरित झाली आहेत, तर उर्वरित ग्रामस्थ शासनाच्या मदतीची वाट पाहत आहेत. गावकऱ्यांचे मत आहे की, प्रशासनाने योग्य ती उपाययोजना न केल्यास अशा घटना पुन्हा घडू शकतात.

**शेतकऱ्यास नुकसानभरपाईची मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे पंचनामा करून शिंदे यांना योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, शासनाने तत्काळ मदत न केल्यास शेतकरी व पशुसंवर्धन क्षेत्र दोन्हीवर गंभीर परिणाम होऊ शकतो.**

## अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना पालकमंत्री अजित दादा पवार यांच्याकडून दिवाळीभेट

### ५७७ कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर, बळीराम गवते यांनी मानले आभार

बीड: जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले होते. महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीत बाधित शेतकऱ्यांसाठी ५७७ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे. हे पॅकेज खर्या अर्थाने दिवाळी भेट ठरणार आहे. यामुळे पालकमंत्री अजित दादा पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी आभार मानले आहेत. अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने पॅकेज जाहीर करून दिवाळी भेट दिली असून दोन दिवसात ही रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा होणार आहे. सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांना आधार मिळणार आहे. ज्या शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नाहीत



त्यांनी दोन दिवसात ईकेवायसी करुन घेणे आवश्यक आहे. बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. बीड जिल्ह्यातील गोदावरी आणि सिंदफना, अमृता, मांजरा नदीमध्ये आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या होत्या तर अतिवृष्टीमुळे शेतमालाचे प्रचंड नुकसान झाले होते. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याचा दौरा करुन शेतकऱ्यांचे अश्रू पुसले होते. बीड विधानसभेत मतदार संघात झालेल्या नुकसानीची विविध ठिकाणी पाहणी केली. यानंतर सदरील अहवाल उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना सादर केला होता. दि.१६ रोजी महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय जारी करुन अतिवृष्टी बाधित बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ५७७ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे. शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नाहीत त्यांनी दोन दिवसात ईकेवायसी करुन घ्यावी असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी केले आहे.

## आणखीन एक मानाचा तुरा विभागीय स्पर्धेसाठी निवड




बीड प्रतिनिधी :-पाटोदा माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय पाटोदा (बेल) ता. जि. बीड चे आज झालेल्या बीड जिल्हा स्तरीय मैदानी क्रीडा 3000 मीटर धावणे स्पर्धेत घवघवीत यश चि.सोनाजी राजाभाऊ बहिरवाळ याने स्पर्धेमध्ये सर्व प्रथम आल्याबदल त्याचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव मा. मंत्री. जयदत्तजी (अण्णा) क्षीरसागर साहेब तसेच संस्थेचे प्रशासनधिकारी डॉ. राजा मचाले सर व सहाय्यक प्रशासन आधिकारी योगशजी पवार सर तसेच कार्यवाहक एम. ए. राऊत सर विद्यालयाचे प्राचार्य धनवंत मस्के सर यात्रसंगी क्रीडा शिक्षक वाघमारे सर व प्राध्यापक प्राध्यापिका, शिक्षक , शिक्षीका, शिक्षकेत्तर कर्मचारी सर्वानी अभिनंदन केले.व विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा तसेच पाटोदा (बेलखण्डी)पंचक्रोशीतून त्याला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या देण्यात आल्या अभिनंदन

## राज्यस्तरीय व विभागस्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धासाठी तयारीला वेग जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी नियोजन बैठक संपन्न

बीड, दि,17:- राज्यस्तरीय तसेच विभागस्तरीय क्रीडा स्पर्धांचे यंदाचे आयोजन भव्य स्वरूपात करण्यात येणार असून त्याच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहा पूर्वतयारी बैठक संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हा क्रीडा अधिकारी, पोलीस अधीक्षक प्रतिनिधी, आरोग्य विभागाचे अधिकारी, शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच विविध क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, "ही स्पर्धा म्हणजे जिल्ह्यातील तरुणाईसाठी एक उत्तम व्यासपीठ आहे. खेळाडूंना योग्य सुविधा, निवास, भोजन व वैद्यकीय सुविधा वेळेवर उपलब्ध होणं आवश्यक आहे." त्यांनी सर्व संबंधित विभागांना समन्वयाने काम करून स्पर्धेच्या तयारीत कोणतीही कमतरता राहू न देण्याचे निर्देश दिले.तसेच क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट आलेल्या खेळाडूंना उत्तम प्रकारची ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन त्यांचा उत्साहा वाढावा



याद्दष्टीने त्यांचा यथोचित् गौरव करण्यात यावा.

या स्पधेत् 17 वर्षे मुले व मुली. सहभागी होऊ शकतील. या स्पर्धा दि. 29 ते 31 ऑक्टोबर या दरम्यान बीड येथे छत्रपती संभाजी मैदान येथे व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजन करण्यात येणार आहेत.

जिल्हाभरातून आणि विभागातील विविध तालुक्यांतून खेळाडू सहभाग घेणार आहेत. महत्त्वाचे निर्णय: सर्व खेळांच्या मैदानांची साफसफाई व आवश्यक दुरुस्ती तत्काळ पूर्ण करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले. आरोग्य विभागाने वैद्यकीय पथकाची नियुक्ती करावी, तसेच प्रत्येक मैदानावर प्राथमिक उपचार किट उपलब्ध ठेवण्यात यावे.पोलीस विभागाने वाहतूक व सुरक्षेच्या दृष्टीने नियोजन करावे. स्थानिक विद्यालये व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची स्वयंसेवक म्हणून नेमणूक करण्यात यावी. बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी यांनी सर्व विभागांना समन्वयाने काम करून ही स्पर्धा एक आदर्श आयोजन ठरेल, यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. युवा महोत्सव सांस्कृतीक नवोक्रम व विकसीत भारत जिल्हास्तर व विभागस्तर युवा महोत्सव आयोजन समिती" यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या "विकसित भारत सांस्कृतिक नवोपक्रम" विकसित भारत सांस्कृतिक नवोपक्रमासाठी जिल्हा व विभागस्तरीय युवा महोत्सव जिल्हा व विभागस्तर युवा महोत्सव आयोजन समिती यांच्या अध्यक्षतेखाली "विकसित भारत 2047" या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक नवोपक्रम बैठकीत युवा महोत्सवाच्या आयोजनासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. यात सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन, युवक-युवतींची निवड प्रक्रिया, पारंपरिक व आधुनिक कलांच्या सादरीकरणाची रूपरेषा, प्रचार व प्रसाराचे माध्यम, तसेच आयोजनासाठी लागणाऱ्या सुविधांची पूर्वतयारी यावरही चर्चा करण्यात आली. "विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांचे योगदान महत्त्वाचे आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळेल आणि त्यांच्यातील कलागुणांना चालना मिळेल." तसेच, सर्व संबंधित विभागांनी परस्पर सहकार्याने नियोजन वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. या महोत्सवातून केवळ सांस्कृतिक उन्नतीच नव्हे, तर सामाजिक एकात्मता, पर्यावरण संवर्धन, डिजिटल साक्षरता अशा अनेक विषयांचा समावेश असणार आहे. शेवटी सर्व उपस्थितांनी उत्साहपूर्वक सहभाग देत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले.

बैठकीपूर्व जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी प्रस्ताविक केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शनिवार १८ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## तुमचे सोने 91.6% शुद्ध की 99.9% शुद्ध? शुद्धता कशी



तुम्हाला यंदा दिवाळी धनत्रयोदशीला सोने खरेदी करायचे असेल तर ही बातमी नक्की वाचा. भारतात सोने खरेदी करण्याची परंपरा फार पूर्वीपासून चालत आली आहे. लग्नापासून अनेक प्रसंगी सोन्याची मागणी वाढते. सणासुदीच्या काळात दिवाळीच्या दिवशी सोन्याची खरेदी आणखी वाढते. तुम्हीही दिवाळीच्या दिवशी सोने खरेदी करण्याच्या तयारीत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी खूप महत्वाची आहे. अनेक लोकांना चिंता आहे की ते खरेदी करीत असलेले सोने बनावट आहे की खरे. अशा परिस्थितीत सोन्याची शुद्धता ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स (BIS) सोन्याची शुद्धता प्रमाणित करण्यासाठी हॉलमार्किंग करते. तरीही बऱ्याच लोकांना हे माहित नसते की कोणत्या हॉलमार्कचा अर्थ किती शुद्ध सोने आहे. हॉलमार्किंगची ओळख करून तुम्ही शुद्ध सोने खरेदी करू शकता. सोन्याची शुद्धता का महत्त्वाची?

सोन्याची शुद्धता जाणून घेणे आज पूर्वीपेक्षा अधिक महत्वाचे झाले आहे. त्याची शुद्धता कॅरेटमध्ये मोजली जाते. उदाहरणार्थ, 24 कॅरेट सोने सर्वात शुद्ध आहे, तर 22 कॅरेट सोने 91.6 टक्के सोने आणि उर्वरित धातू आहेत.

सोन्याची शुद्धता कशी तपासावी?

ॲसिड चाचणी

नायट्रिक आम्लाची अभिक्रिया दिसून येते.

इलेक्ट्रॉनिक टेस्टर

शुद्धता सोन्याच्या चालकतेवरून मोजली जाते.

फ्लोट टेस्ट

शुद्ध सोने पाण्यात टाकल्यावर बुडते.

हॉलमार्किंग

बीआयएस हॉलमार्किंग ही भारतातील सर्वात विश्वासार्ह पद्धत आहे.अशा प्रकारे हॉलमार्किंग तपासा

वास्तविक हॉलमार्किंग ते आहे ज्यामध्ये भारतीय मानक ब्युरोचे त्रिकोण चिन्ह आहे. त्यावर सोन्याची शुद्धताही लिहिलेली आहे. जर सोन्याचे हॉलमार्क 375 असेल तर ते 37.5 टक्के शुद्ध आहे. त्याच वेळी, जर हॉलमार्क 585 असेल तर हे सोने 58.5 टक्के शुद्ध आहे. यासह, हॉलमार्क 750 चे सोने 75.0 टक्के शुद्ध आहे आणि 916 हॉलमार्क असलेले सोने 91.6 टक्के शुद्ध आहे. त्याच वेळी, जर सोने 990 हॉलमार्क असेल तर ते 99.0 टक्के आणि सोने 999 टक्के शुद्ध असेल तर ते 99.9 टक्के शुद्ध असेल.

22 के आणि 24 के सोने दरम्यान फरक

24 कॅरेट सोने- 99.9% शुद्ध, अतिशय मऊ, दागिन्यांसाठी कमी योग्य, गुंतवणूक आणि नाण्यांमध्ये अधिक वापर.

# विना परवाना रास्ता रोको केला;कोरडेवाडीच्या ३०० जणाविरुद्ध केज पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील कोरडेवाडी येथील नागरिकांनी साठवण तलाव मंजूर व्हावा या व इतर मागण्यासाठी मंगळवारीदुपारीं साडे बारा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत विना परवाना रास्ता रोको आंदोलन करून येणारी, जाणारी वाहने व पदाचारी नागरिक यांची अडवणूक केल्याच्या आरोपवरून धर्मवीर संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळ राजे आवारेपाटील, यांचेसह तब्बल ३०० लोकांविरुद्ध केज पोलिसात मंगळवारी रात्री १० वाजता गुन्हा नोंद झाला आहे.

केज तालुक्यातील कोरडेवाडी येथील साठवण तलाव तात्काळ मंजूर करावा या व इतर म ागण्यासाठी राजश्री राठोड –गमेपाटील यांनी ३ ऑक्टोबर पासून कोरडेवाडी येथे उपोषण सुरु केले आहे. परंतु प्रशासनाने व लोकप्रतिनिधिनी याची दखल घेतली नाही म्हणुन ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५–०० वाजण्याच्या दरम्यान तहसील कार्यालयाच्या परिसरात बैलगाडी जाळून प्रशासनाचा निषेध नोंदविला. ११ ऑक्टोबर२०२५ रोजी वडवनी तालुक्यातील टोकवाडी येथील पाझर तलावात महिला व पुरुषांनी जलसमाधी आंदोलन केले. आणि मंगळवारी केज येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दुपारीं १२–३० ते सायंकाळी ५–०० वाजेपर्यंत तब्बल साडेचार तास विना परवाना रास्ता रोको आंदोलन करून येणाऱ्या, जाणाऱ्या वाहणांसह पादचारी यांची अडवणूक केल्याच्या आरोपाखाली पोलीस उपनिरीक्षक सुकुमार बनसोडे यांच्या फिर्यादीवरून केज पोलिसात या आंदोलनाचे नेतृत्व करणारे धर्मवीर संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळराजे आवारेपाटील, स्वप्नील महादेव वरपे, योगेश सुभाष रसाळ, अमोल भीमराव पाटील, योगेश शिवाजी मणेरी, संदीप चाळक, सांभाजी आघाव, विशाल कुटे, अण्णासाहेब जाधव, संतोष प्रल्हाद यादव मदन आश्रुबा यादव, विक्रम अभिमान शिंदे, उस्मान मोहमद शेख, दत्ता यादव, दादाराव हिम्मत कोरडे, अनिल कोरडे, बाबा शेख, गंगाधर यादव बळीराम भीमराव यादव, मारुती त्रिंबक तेरवे,अशोक धोंडोबा वरपे, सुदाम नागोराव कोरडे, संजय जालिंदर गिरी, संतोष वेताळ, पप्पू जयवंता शिंदे, बाजीराव बापूराव कोरडे, हुसैन अमीन शेख, प्रमोद राजेंद्र कोरडे, शरद नारायण कोरडे, अशोक विष्णू यादव, उमेश शिवाजी वरपे, धनराज दादाराव वरपे, अशोक बन्सी यादव, जयराम यांचेसह २०० ते ३०० महिला व पुरुष यांचे विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे हे करीत आहेत.

### बस फोडण्याचे ५ गुन्हे ही नोंद...


दरम्यान रास्ता रोको आंदोलन काळात अज्ञात इसमानी राज्य परिवहन महामंडळाच्या ५ बसवर दगड फेक करून बसच्या काचा फोडल्या प्रकरणी ५ बसचालकांच्या फिर्यादीवरूनही ५ गुन्हे नोंद झाले आहेत.



# चालत्या पिकअपअधून ८० हजाराच्या ८ बोकडांची चोरी

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग शिवारातील पुलाजवळ चालत्या पिकअप मध्ये अज्ञात चोरट्याने चढून प्रती नग १० हजार रुपया प्रमाणे ८० हजाराचे ८ बोकडाची चोरी केल्या प्रकरणी पिकअप चालकाच्या फिर्यादीवरून केज पोलिसात अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे.




बीड तालुक्यातील नांदूर हवेली येथून २० बोकड लातुर जिल्ह्यातील मुरुड येथील जाणवराच्या बाजारात विक्रीसाठी घेवून जात आसताना मस्साजोग शिवारात पावणे चार ते सव्वा चार वाजण्याच्या दरम्यान चालत्या पिकअप वर अज्ञात चोरट्यानी चढून ८० बोकडाची चोरी केली. प्रत्येकी १० हजार रुपया प्रमाणे ८० हजार रुपयाच्या ८ बोकडाची अज्ञात चोरट्यानी चोरी केल्याप्रकारांनी पिकअप चालक भाऊसाहेब बाबासाहेब सिदगुर रा नांदूर हवेली ता बीड. यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आसून पोलिस निरीक्षक स्वप्रील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक उप निरीक्षक प्रल्हाद चव्हाण हे पुढील तपास करीत आहेत.

# माजलगांव करांच्या साठी ही आनंदाची बाब

माजलगांव करांच्या साठी ही आनंदाची बाब आहे एक सर्व सामान्य घरातल्या मुलाला कायद्याचे विद्यार्थी टीम चे नेतृत्व करण्याची संधी भेटली व त्यांच्या सह त्याच्या पुर्ण टीम चे या उत्कृष्ट कामगिरी बद्दल सत्कार व सन्मान जालना जिल्हाधिकारीच्या वतीने करण्यात आले. एम.एस.एस लॉ कॉलेज जालना येथे माजलगांव चे सुपुत्र मोईन मेहरताज खान यांनी व विद्यार्थ्यी मित्र टीम ने इंदेवाडी, जालना या ठिकाणी चाईल्ड मॅरेज प्रोहिबीशन ॲक्ट २००६ या कायद्याची सखोल माहिती आपल्या कलेतुन सादर करुन दाखविले व समाजात चांगला मॅसेज दीला त्याची दखल घेत जालना




जिल्हाअधिकारी मा.श्री.आशिमा मित्तल (आए.ए.एस) मॅडम यांनी मोईन मेहरताज खान व त्यांच्या टीम चे ट्राफी व सर्टिफिकेट देऊन सत्कार व सन्मान केला या प्रसंगी संस्थेचे सचिव मा.श्री.मनिषाताई टोपे साहेब ही



उपस्थित होते. ही बाब माजलगांव च्या जनते पर्यंत पोहचताच माजलगांव चा युवा वर्ग त्यांना सोशल मिडिया च्या व दुरध्वनी आणि इतर माध्यमातून शुभेच्छा देऊ लागला या कामगिरी बद्दल त्यांचे खुप खुप अभिनंदन.

# चला घेवू एकच वसा, मराठीला बनवू ज्ञानभाषा - डॉ. वसुदेव ( बप्पा ) गायकवाड

केज/ प्रतिनिधीस्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे दिनांक १५ - १० -२०२ ५ रोजी “डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती “. अर्थात “ वाचन - प्रेरणा दिन” घेवू चला एकच वसा, मराठीला बनवू ज्ञानभाषा “ हे घोषवाक्य प्रमाणभूत मानून “ ग्रंथप्रदर्शन, ग्रंथवाचन, विश्व कोषाबाबत माहिती व कार्यशाळा, व्याख्यान, सामुहिक वाचन, चर्चा चर्चासत्र, कार्यगौरव, साहित्यीकांची मुलाखत, ग्रंथभेट आदी सांस्कृतीक कार्यक्रम साजरे करून “ वाचन - प्रेरणा दिन” साजरा करण्यात आला. सकाळी ०८ ते रात्री ०८ पर्यंत विविध कार्यक्रम व उपक्रम साजरे करण्यात आले. “. चला घेवया एकच वसा, मराठीला बनवू ज्ञानभाषा “ याचे नियमित पालन करन मराठी





ज्ञानभाषा बनवण्यासाठी प्रत्येक मराठी साहित्य वाचावे व जपावे असे अवाहन ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाज समाजसेवक सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्यात डॉ. वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांनी “ व्याख्यान” प्रसंगी अवाहन केले.सर्व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच शिवाजीराव गायकवाड हे होते. सर्वप्रथम डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेल मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले व सर्व कार्यक्रमाचे उद्घाटनही करण्यात आले. विश्वकाषाबाबत माहिती व कार्यशाळेत दादासाहेब गायकवाड,ज्ञानोबा भोगजकर, डॉ. वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.ग्रंथभेट २० वाचकांना देण्यात आले.सामुहिक वाचन करण्यात आले. तसेच वयक्तीक ग्रंथवाचनही करण्यात आले. साहित्यीक, कवी प्रा. माणिकराव आनंदगांवकर यांची मुलाखत सेवानिवृत्त शिक्षक रामकृष्ण( तात्या) गायकवाड यांनी घेतली. तसेच जेष्ठ साहित्यीकांचा सत्कार रविंद्र गायकवाड( पेन्टर) यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार, ग्रंथभेट देऊन करण्यात आला. ग्रंथ प्रदर्शनात माजी सरपंच रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव, आरुण गायकवाड, संजय सोनवणे, आनंद( भैय्या) गायकवाड, बबन पुंड, कृष्णराजे गायकवाड, शिवदास गायकवाड, आर.ए. गायकवाड, कमलाकर साबळे, नारायण गायकवाड, यांच्यासह शेकडो टप्पाटप्पाने वाचकांनी सहभाग घेतला. सकाळी ०८ ते रात्री ०८ या वेळात सर्व कार्यक्रम संपन्न झाले. अध्यक्षीय समारोप माजी सरपंच शिवाजीराव गायकवाड यांनी केला. सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद( भैय्या ) गायकवाड यांनी केले.

# तरुणांनो, उदोउदो करून आयुष्याच वाटोळ करून घेऊ नका

-------------------------------

चोविस तास ऑनलाईन राहून नेत्यांच्या पोस्ट टाकून तुमच्या पोटाचा प्रश्न सुटणार आहे का ? तरुणाई आज जास्त सोशल मीडिया वर २४ तास सक्रिय राहून स्वतःचे नेट पॅक टाकून अमका आमचा नेता तमका आमचा नेता, यातच धन्यता मानताना दिसून येत आहे. पुढाऱ्यांच्या मागे उदोउदो करत फिरून आयुष्यातील खरे कमविण्याचे दिवस आजची तरुणाई बरबाद करू लागली आहे. कुटुंबातील लोकांचे कष्ट विसरून, आपण मात्र टवाळक्या मारत फिरत बसतो. पुढाऱ्यांच्या पाठीमागे जय करत फिरतो. घरात एखादी वस्तू कमी पडली तर तुम्हाला तुमचा पुढारी देतो का, शेवटी कष्ट करूनच ती वस्तू खरेदी करावी लागते. याचेच भान आपण विसरतो. हेच वय असतं याच वयात आपण काहितरी कमवू शकतो. चार पैसे घरी आणून आई वडिलांना हातभार लावू शकतो. परंतु कष्ट करण्याची क्षमता कमी झाल्याने आणि सोशल मीडियावर जास्त ओळखी झाल्याने कामाची लाज वाटू ला-गली. हीच आमची शोकांतिका आहे. आभासी दुनियेत जगण्यात धन्यता मानून पोट भरत नसतं. याचं भान तरुणांनी ठेवलं पाहिजे. कोणत्याही प्रकारची कामे करा आणि आई वडिलांना सांभाळा. त्यांचे कष्ट डोळ्यासमोर ठेऊन त्यांनी आपल्या साठी केलेला संघर्ष आठवून त्यांना वृद्ध पणात आरामात ठेवण्यासाठी आजच चार पैसे कमावण्याची सवय लावने ही काळाची गरज आहे. त्यासाठी प्रत्येक तरुणांनी शिक्षण पूर्ण झाल्यावर आणि नौकरीची जर शक्यता नसेल तर त्यांनी इतर कामात व्यर्थ वेळ न घालता छोट्या मोठ्या उद्योगाकडे लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. तरुणांनी प्रथम शिक्षणाला महत्व देऊन शिक्षण पूर्ण करून नौकरीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. गुणवत्ता असेल तर नौकरी मिळू शकते. नौकरी मिळाली नाही म्हणून निराश न होता शिक्षणाचा फायदा एखाद्या चांगल्या उद्योग व्यवसायासाठी होऊ शकतो. उद्योगात देखील मोठे नाव लौकिक मिळू शकते. उद्योगासाठी भांडवल नसेल तर कोणाच्या दुकानावर अथवा कंपनीत अथवा इतर कुठल्याही ठिकाणी काम करून अनुभव आणि पैसे मिळवू शकता. आणि त्यातून छोटा मोठा उद्योग का होईना उभारू शकता. आणि आपल्या आईवडिलांना आर्थिक हातभार लावू शकता. परंतु ही तळमळ युवकांमध्ये दिसून येते का? हाच खरा प्रश्न आहे. शिक्षण संपले नौकरी लागत नाही शेतात काम करू शकत नाही. मग कोण्यातरी पक्षाचा झेंडा उचलून युवा नेत्याच्या पाठीमागे आई वडिलांच्या कमाईवर कडक पांढरेशुभ्र कपडे घालून जय जय करत फिरायचे आणि पुन्हा चारसहा महिन्यात कोण्यातरी पदाची निवड होते. आणि पेपरात निवडीचे फोटो छापून आले की झाले गल्लीतील किंवा शहरातले युवा नेते आणि येथूनच सुरू होते. आयुष्याचं वाटोळं व्हायला २४ तास ऑनलाईन राहून आमचं दैवत आमचं काळीज खंबीरसाथ, आमचं हृदयस्थान, म्हणून आईबापांच्या जीवावर बसून खायचं आणि नेटप्याक सुद्धा त्यांच्याकडूनच घ्यायचं आणि गुणगान मात्र राजकारण्याच गायचं असली दळभद्री औलाद ज्या आईबापांच्या पोटाला असेल तर काय अपेक्षा ठेवायची यांच्याकडून खुशाल कामधंदा सोडून आणि फुकटचं पेट्रोल जाळून नेत्यांच्या मागे उदोउदो करत फिरताना २०ते ३० च्या आतील तरुणाई दिसत आहे. सुशिक्षित बेजगारी खूप वाढली असून तरुणांच्या हाताला कामे नाहीत. म्हणून एकीकडे आपण ओरडतो रोजगाराच्या संधी उपलब्ध केल्या पाहिजेत म्हणून आपण मागण्या करतो. परंतु त्या रोजगाराच्या संधी आज तरी कोण्या पुढाऱ्यांच्याकडून पूर्ण होतील ही अपेक्षाच मुळात चुकीची वाटू ला गली आहे. या तरुणांच्या हाताला काम देऊन यांचे झेंडे कोण उचल-तील ? यांच्या मागे कोण फिरणार राजकारणात घराणेशाही आहे तिथे तुमच्या आमच्या सारख्याला कोणी विचारत नाही, आणि कार्यकर्ता मोठा करू कोणालाच वाटत नाही त्यासाठी तरुणांनी आयुष्यातील अनमोल दिवस वाया न घालवता छोटा मोठा स्वतःचा उद्योग व्यवसाय उभारावा आणि काबाड कष्ट करणाऱ्या आपल्या आई वडिलांना आर्थिक हातभार लावून कुटूंब सुधाराव आणि नंतर राजकारणाची आवड असेल तर निवड करावी राजकारण करावं परंतु कमविण्याचे वय एकदा निघून गेले तर आयुष्याची बरबादी होते याचे भान ठेवणे गरजेचे आहे.

**(निवडणूकीचा धुरळा) *संपादक -आशोक नागरगोजे**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १८ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## बचत करण्यापासून ते ट्रेनच्या तिकिटांपर्यंत, पोस्ट ऑफिसमधून काय करू शकता,




सणासुदीचा हंगाम सुरू झाला आहे आणि दिवाळी सारख्या मोठ्या सणासुदीला घरी जाण्यासाठी ट्रेनच्या तिकिटांची मोठी मागणी आहे. अशा वेळी रेल्वे काउंटर आणि आयआरसीटीसीच्या वेबसाइटवर तिकीट बुक करणे हे आव्हानापेक्षा कमी नाही.

आता प्रवाशांसाठी एक दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. आता तुम्ही तुमच्या जवळच्या पोस्ट ऑफिसमधूनही ट्रेनची तिकिटे बुक करू शकता. चला तर मग जाणून घेऊया भारतीय पोस्ट ऑफिसमधून कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत. भारतीय टपाल विभाग देशभरात विविध सेवा पुरवते. यात पत्रे आणि पार्सल पाठविणे, तसेच बँकिंग, लहान बचत योजना आणि विमा (पोस्टल लाइफ इन्शुरन्स) यासारख्या सुविधांचा समावेश आहे. टपाल विभागाच्या अल्पबचत योजना सरकारद्वारे चालवल्या जातात आणि देशातील लाखो लोक त्यात गुंतवणूक करतात.

लोकांमध्ये बचतीची सवय वाढवणे आणि आर्थिक समावेशकता म्हणजे प्रत्येक व्यक्तीला बँकिंग सेवा उपलब्ध करून देणे हा त्यांचा उद्देश आहे. आता सरकार पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून रेल्वेची तिकिटे बुक करत आहे.

रेल्वेची तिकिटे पोस्ट ऑफिसमधून उपलब्ध

इंडिया पोस्ट विभाग आता रेल्वे मंत्रालयाच्या सहकार्याने रेल्वे तिकीट बुकिंग सेवा देखील देत आहे. म्हणजेच, आता केवळ रेल्वे स्टेशन किंवा ऑनलाइन पोर्टलच नव्हे तर आपल्या क्षेत्रातील पोस्ट ऑफिसही ट्रेनचे तिकीट बुक करण्यास मदत करेल. ही सुविधा सध्या देशभरातील 333 निवडक पोस्ट ऑफिसमध्ये सुरू करण्यात आली आहे, विशेषत: ग्रामीण आणि निमशहरी भागात जिथे रेल्वे काउंटर अस्तित्वात नाहीत. इंडिया पोस्टच्या अधिकृत वेबसाइटनुसार, रेल्वे मंत्रालयाच्या (MOR) सहकार्याने सर्व श्रेणींची रेल्वे आरक्षण तिकिटे निवडक पोस्ट ऑफिसमध्ये विकली जात आहेत जेणेकरून लोकांना त्यांच्या जवळच्या ठिकाणी ही सुविधा मिळू शकेल. पोस्ट ऑफिसमधून ट्रेनचे तिकीट कसे बुक करावे? 1. सर्व प्रथम, आपल्या जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये जा जिथे पीआरएस काउंटर स्थापित आहे. 2. आपल्या प्रवासाची माहिती, स्थानकाचे नाव, तारीख, ट्रेनचे नाव किंवा क्रमांक आणि वर्ग द्या. 3. विहित फॉर्म भरा आणि पैसे द्या. 4. पोस्ट ऑफिसचे कर्मचारी त्वरित सिस्टममध्ये आपले बुकिंग करतील आणि तिकीट तेथे उपलब्ध होईल. 5. या सेवेद्वारे स्लीपर, एसी आणि जनरल या सर्व वर्गांची तिकिटे बुक करता येतील. रेल्वेचा नवा नियम लागू 1 ऑक्टोबरपासून रेल्वेने ऑनलाइन तिकीट बुकिंगसाठी नवीन नियम लागू केला आहे. आता केवळ आधार-सत्यापित युजर्स आयआरसीटीसीच्या वेबसाइट किंवा ॲपवर तिकीट उघडल्यानंतर पहिल्या 15 मिनिटांसाठी तिकिटे बुक करू शकतील. अधिकृत एजंट्ससाठी 10 मिनिटांचे निर्बंध पूर्वीप्रमाणेच सुरू राहतील. म्हणजेच, जर तुमचे आयआरसीटीसी खाते आधारशी जोडलेले नसेल तर तुम्ही तिकीट उघडल्यानंतर पहिल्या 15 मिनिटांत बुकिंग करू शकणार नाही.

## कै.चंद्रकलाताई गदळे यांच्या वर्षश्राध्द कार्यक्रमा निमित्त रविवारी समाधान शर्मा महाराज यांच्या कीर्तनाचे दहिफळ (वडमाऊली) येथे आयोजन

केज दि.१७( प्रतिनिधी ) तालुक्यातील दहिफळ (वड) येथील सेवानिवृत्त प्राचार्य तथा शालेय संस्थापक अध्यक्ष सखाहारी (तात्या) गदळे यांच्या पत्नी व भाजपा युवा मोर्चाचे केज तालुकाध्यक्ष राहुलभैय्या गदळे यांच्या मातोश्री कै.सौ.चंद्रकलाताई सखाहारी गदळे यांच्या चतुर्थ वर्षश्राध्द कार्यक्रमा निमित्त दि.१९ ऑक्टोबर रविवार रोजी सकाळी साडेदहा वाजता सुप्रसिद्ध रामायनाचार्य किर्तनकार ह.भ.प. समाधान शर्मा महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.तरी या कार्यक्रमाला



आपण उपस्थित रहावे अशी विनंती गदळे परीवाराच्या वतीने करण्यात आली आहे. केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील येथील सेवानिवृत्त प्राचार्य तथा शालेय संस्थापक अध्यक्ष सखाहारी (तात्या) गदळे यांच्या पत्नी व भाजपा युवा मोर्चाचे केज तालुकाध्यक्ष राहुलभैय्या गदळे यांच्या मातोश्री कै.सौ.चंद्रकलाताई सखाहारी गदळे यांच्या चतुर्थ वर्षश्राध्द कार्यक्रमा निमीत्त दहिफळ (वड) ता.केज येथील श्रीक्षेत्र वडमाऊली मंदीरा जवळ ह.भ.प.सखाहारी (तात्या) गदळे यांनी स्थापन केलेल्या शिवप्रतिष्ठाण संस्थान येथे सुप्रसिद्ध रामायनाचार्य व औकीर्तनकार ह.भ.प.समाधान शर्मा महाराज यांच्या सुश्राव्य किर्तनाचा कार्यक्रम रविवार दि.१९ ऑक्टबर रोजी सकाळी साडे दहा वाजता आयोजित केला आहे. या कार्यक्रमास आपण उपस्थित रहावे अशी विनंती ह.भ.प. सखाहारी (तात्या) गदळे,राहुलभैय्या गदळे,शरद बप्पा गदळे,सरपंच अनिताताई गदळे,डॉ. शशिकांत दहिफळकर,जयदत्त दहिफळकर व गदळे परिवाराने केली आहे.

## सामाजिक संरचनेचे शिल्पकार भारतरत्न श्रद्धेय नानाजी देशमुख – डॉ. कमलकिशोर लड्डा

माजलगाव/प्रतिनिधी सामाजिक संरचनेचे शिल्पकार भारतरत्न श्रद्धेय नानाजी देशमुख होते असे प्रतिपादन श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव माजी विद्यार्थी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या जयंती व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे होते. पुढे बोलताना ते म्हणाले की नानाजी देशमुख भारतासह जगभरात त्यांच्या आर्थिक सामाजिक, राजकीय कार्यामुळे निष्णात व आदर्शवत कर्मयोगी म्हणून प्रसिद्ध आहेत. ते प्रखर राष्ट्रभक्त, आदर्श राष्ट्रप्रमुख, विनम्रता, सेवावृत्ती व त्यागमूर्ती यांचे उत्कट मिलाप असणारे व्यक्तिमत्व होते. समाज सुधारक म्हणूनही नानाजी देशमुख यांची ओळख




आहे. ग्रामविकासाचे प्रणेते म्हणून त्यांनी कृषी, ग्रामोद्योग, सार्वजनिक आरोग्य, ग्रामीण अर्थव्यवस्था इत्यादी कामात रचनात्मक असे योगदान दिले आहे. जल, जंगल जमीन, शिक्षण व लोकजीवन ही नानाजींच्या कार्याची बलस्थाने राहिलेली आहेत. समाजाच्या व ग्रामीण भागाच्या सर्वत्रिक विकासासाठी भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या विचारांची सद्यस्थितीत गरज असल्याचे प्रतिपादन ही त्यांनी याप्रसंगी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी देखील आयुष्यभर समाजाची सेवा केली व एक आदर्श उभा केला तो आदर्श आजच्या पिढीने अंगीकारणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, सध्या नानाजी देशमुख यांनी जे आपल्या जीवनामध्ये कार्य केले ते आदर्शवत असे आहे. चित्रकूट या ठिकाणी त्यांनी जो प्रकल्प उभारला आहे तो आजच्या तरुणाई व समाजासमोर एक आदर्श व मूर्तीमंत असे उदाहरण आहे. त्यांच्या विचाराचा वारसा आपण यापुढे चालवला पाहिजे असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले. त्यांचे विचार आपण आचरणात आणले पाहिजेत व त्या आचरणानुसार आपले जीवन यापन केले तर नक्कीच आपण नानाजी देशमुख यांच्यासारखे महान विभूती बनू शकता असे ते विद्यार्थ्यांना म्हणाले. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे देखील विचार आपण आचरणात आणले पाहिजेत असे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश गटकळ यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी मानले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे पर्यवेक्षक परमेश्वर खेत्री, कार्यालय श्री. विजय कुलकर्णी व महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## पाच वर्षात कधी जवळुन गेले तरी रामराम न घालणारे आता फोन करुन म्हणतात रामराम काय चाललंय,कसे आहात ?काय काम आसलं तर सांगा बोलतो मी....!

## व्वा रे राजकारणी,ज्याला पुसायला येईना ते पण म्हणतय लक्ष राहु द्या आपल शिट लागतय !

केज! दशरथ चवरे सध्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका, यांच्या निवडणुका काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत गट,गणाचे आरक्षण जाहीर झाले आहे, आशातच होसे, नवसे कामाला लागले आहेत गेल्या बर्याच दिवसांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक होत आहे,या काळात जनतेने काय सहन केले हे भुरटे पुढारी विसलेत वाटतं,आता ज्याच्या तोंडाकड कधी बघत नव्हते त्याला फोन करून म्हणतात “काय चाललंय कुठे आहात. काय काम आसल तर सांगा मी बोलतो नेत्यांना, सगळ ठिक आहे ना......!काय बी आडचण आसु द्या अर्ध्या रात्री फोन करून सांगा दोन मिनीटात काम करुन घेऊ, असे फोन, मेसेज करुन विचार पुस करत आहेत भुरटे पुढारी, याच गोरगरीबांच्या मड्यावरच लोणी खाणाऱ्यांनो आताच कसा



पुळका आला?गेल्या काही दिवसांपासून घरकुल बावीस हजार, विहीर कुशल बील काढण्यासाठी गोरगरीब शेतकऱ्यांकडून वीस हजार रुपये घेताना तुमचे हात थरथरले का नाहीत,? हेच का तुमचे पुतना मावशी चे वरवरचे बेगडी प्रेम, पण आता गोरगरीब जनता हुशार झाली आहे, ज्या घरकुलासाठी, विहीरी साठी जी रक्कम घेतली त्यांच्या डब्बल वसूल केल्या शिवाय जनता राहणार नाही तुम्हाला हिसका दाखवल्या शिवाय जनता स्वस्त बसणार नाही असाच पुळका जर पडत्या काळात दाखवला आसता तर आज जनतेला तुम्हाला हात जोडून, बघा तेवढ लक्ष ठेवा आपलीच माणस आपण मोठी करायला पाहिजे, हि बोलण्याची वेळ आली नसती, याच गोरगरीबांच्या जिवावर पाच वर्ष तुम्ही सत्ता भोगता आणि याच गोरगरीबांला एखादी योजना आली तर ती फुकट होत नाही व्वा रे लोक प्रतिनिधी, पण आता जनता हुशार झाली आहे कोणाचा विजय आणि कोणाचा पराजय करायचा हे सर्व सामान्य मायबाप जनताच ठरवणार अशी जोरदार चर्चा चावडीवर, वटयावर बसुन नागरीक करत आहेत. एक दिवस थोडं आमिष दाखवता व नंतर पाच वर्ष जवळचा लांबचा विसरता खरोखर हिच का? ती पवित्र लोकशाही अरे लाजा वाटू द्या आपण बोलतो काय आणि वागतो काय? हे तुम्हाला तरी पटते का. असो परंतु आता सर्वसामान्य जनता फार हुशार झाली असून कोण किती पाण्यात आहे हे त्यांना सांगण्याची आवश्यकता वाटत नाही आपण फक्त आपले डिपॉझीट जप्त होवू नये याची काळजी घ्या, जेवढे जनतेला आपण वेढ्यात काढले आहे त्याच्या दुप्पट परतफेड करावी लागणार आहे, निवडणुकिचे घोडे मैदान, महाभारत लांब नाही आपणही पहाणारच आहात परंतू आपापल्या सद्सद् विवेक बुद्धीला स्मरून आपण किती जनतेला वेड्यात काढलंय याचा मनोमन विचार करा ही लोकशाही आहे बॉस जनतेने जर विचार केला तर आपले डिपॉझीट जप्त झाल्याशिवाय राहणार नाही परंतु हे तेव्हा कळते जेव्हा निकाल हाती येतो तोपर्यंत आपण पैशाच्या, सत्तेच्या आणि अभिमानाच्या थाटात असता वेळ आल्यावर सर्वसामान्य जनताआपणास योग्य धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही अशी सर्वसामान्य नागरीतून बोलले जात आहे.

क्रमशः पुढील भाग लवकरच.

## ‘स्वाराती’ संस्थेकरीता अभ्यागत मंडळ; अध्यक्षपदी खा.बजरंग सोनवणे यांची नियुक्ती राज्य सरकारचा निर्णय

बीड: स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, अंबाजोगाई या संस्थेकरीता अभ्यागत मंडळ गठीत करण्यात आले आहे. या मंडळाच्या अध्यक्षपदी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा निर्णय राज्य शासनाच्या वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या वतीने काढला आहे. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय अंबाजोगाई या संस्थेत अंमलात असलेले नियम व आदेश यांच्या चौकटीमध्ये राहून रुग्णालयाच्या व्यवस्थापनांत सुधारणा करण्यासाठी मार्ग व साधने तयार करणे, निरनिराळ्या कामासाठी व विभागांसाठी मंजूर केलेल्या आर्थिक तरतूदींचा योग्य प्रकारे वापर होत आहे किंवा नाही यावर देखरेख ठेवणे. रुग्णालय संबंधिच्या जनतेच्या तक्रारीचा अभ्यास करणे व त्याचे निवारण होण्यासाठी करावयाच्या पध्दतीबद्दल शिफारस करणे, रुग्णालयातील कर्मचारी वर्गाची अनियमित उपस्थिती, अवक्तशीरपणा व गैरवर्तन इत्यादींबाबत आढावा घेणे व त्यांत सुधारणा व्हावी म्हणून शिफारस करणे. रुग्णालय परिसराची तपासणी करणे, सर्वसाधारण कामकाजांचा अभ्यास करणे व दोष आढळल्यास ते दूर करण्यासाठी उपाय सुचविणे. रूग्णालयासाठी जनतेकडून देणग्या नियंत्रित करणे, गोळा करणे व स्विकारणे व राज्य शासनास रुग्णालयांसाठी



अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही अशा विशेष बाबींसाठी त्या उपयोगात आणणे, कोणती देणगी स्विकारण्यामध्ये अथवा तिचा रुग्णालयासाठी उपयोग करताना अंमलात असलेल्या नियमांचा व आदेशांचा भंग होता कामा नये. उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी समितीच्या कामकाजामध्ये आवश्यक त्या पध्दती विहीत करणे व इतर आवश्यक त्या गोष्टी करणे. आरोग्य विषयक राष्ट्रीय कार्यक्रमांच्या अमंलबजावणीचा आढावा घेणे आदि विषयांसाठी अभ्यागत मंडळ गठीत करण्यात आलेले असून खा.बजरंग सोनवणे यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

### दोन महिन्याला खा.सोनवणे घेतील बैठक

१) समितीची बैठक दोन महिन्यातून किमान एकदा तरी बोलविण्यात येणार आहे. अध्यक्षांनी निर्देशित केल्यास, अधिक वेळा बैठक बोलविता येईल.

२) कोणीही सदस्य सतत दोन बैठकीत अनुपस्थित राहिल्यास त्याचे सभासदत्व आपोआप रद्द होईल, परंतु सदस्य योग्य व सबळ कारणांसाठी अनुपस्थित राहिला असल्यास सभासदत्व पुढे चालू ठेवण्यास शासन अनुमती देईल.

३) समितीच्या प्रत्येका बैठकीची आगाऊ सूचना बैठकीच्या दिनांकापासून १० दिवस अगोदर बैठकीच्या कार्यसूचीसह समिती सदस्यांना पाठविण्यात येईल.

४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना समितीच्या कोणत्याही बैठकीस उपस्थित राहण्याचा हक्क राहील व त्या उपस्थितीच्यावेळी त्यांना समितीच्या सदस्यांचे हक्क व दर्जा प्राप्त असेल.

५) समितीच्या बैठकीचा अहवाल वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुबई यांना समितीच्या सदस्य सचिवांनी बैठकीच्या दिनांकापासून एक आठवड्याच्या आत पाठवावा.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शनिवार १८ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# धनंजय मुंडेंनी माझ्या बहिणीवर बलात्कार केला, मी पुरावे घेऊन जरांगे पाटलांकडे... करूणा मुंडेंच्या विधानाने खळबळ

राष्ट्रवादीचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांची अडचण वाढण्याची शक्यता आहे. करूणा मुंडे यांनी धक्कादायक विधान केले आहे. धनंजय मुंडेंनी माझ्या बहिणीवर बलात्कार केला, मी पुरावे घेऊन जरांगे पाटलांकडे गेले होते असं करूणा मुंडे यांनी म्हटलं आहे. मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत काय चर्चा झाली याचीही माहितीही करूणा मुंडे यांनी दिली आहे. करूणा मुंडे यांनी नेमकं काय म्हटलं ते सविस्तर जाणून घेऊयात. मी जरांगे पाटलांकडे गेले होते – करूणा मुंडे

करूणा मुंडे यांनी, 'मी जरांगे पाटलांकडे गेले होते. त्यांना मी माझ्याकडे असलेल्या पुराव्यांच्या बाबतही सांगितले होते. पण मला त्यांनी खूप समजावून सांगितले. अजून धनंजय मुंडे यांचे काहीच बाहेर काढलेले नाही बाहेर काढले तर महाराष्ट्रात राहणं मुश्किल होईल स्वतःच्या समाजाचे लोक चप्पलने मारतील असं विधान केलं आहे माझ्या बहिणीवर बलात्कार केला – करूणा मुंडे

पुढे बोलताना करूणा मुंडे म्हणाल्या की, माझ्या बहिणीवर बलात्कार केला, माझ्या आईने आत्महत्या केली ती सुसाईड नोट आणि पुरावे माझ्याकडे आहेत. धनंजय मुंडेने गुंडा गॅग पाळलेली होती. माझं धनंजय मुंडे ला चॅलेंज आहे मी अंगावर येते मला शिंगावर घे. तुला जीआर कळतो, तुला शपथ पत्र कळतं का? असा सवालही करूणा



मुंडे यांनी धनंजय मुंडे यांना विचारला आहे. पुढे बोलताना करूणा मुंडे म्हणाल्या की, जरांगे पाटलांनी सर्वांना न्याय दिला, सर्व जातीतील लोकांना न्याय दिला असं विधान केलं आहे.. 2021 साली आरोप

दरम्यान, याआधी करूणा मुंडे यांची बहीण रेणू शर्मा यांनी 2021 मध्ये, धनंजय मुंडे यांनी आपल्यावर बलात्कार केल्याचा आरोप केला होता. रेणू शर्मा यांनी म्हटलं होतं की, 'मी धनंजय मुंडे यांना 1996 पासून ओळखते. त्यांनी 2006 पासून वारंवार माझ्यावर बलात्कार केला. 2006 साली माझी बहीण बाळंतपणासाठी इंदौरला गेली होती. तेव्हा घरात कुणी नाही हे माहिती असूनही ते घरी आले आणि माझ्यावर बलात्कार केला.' याबाबत रेणू शर्मा यांनी पोलिसांत तक्रारही केली होती, मात्र काही दिवसांनंतर ही तक्रार मागे घेण्यात आली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा हे प्रकरण चर्चेत आले आहे. आता आगामी काळात करूणा मुंडे या मनोज जरांगे पाटील यांच्या मदतीने याबाबत आवाज उठवणार का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# शेतकऱ्यास मारहाण करुन १० तोळे सोन्याचे दागिने लंपास

## सुशी येथे धाडसी चोरी ; गेवराई पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल

गेवराई : घराच्या लोखंडी गेटचे कुलूप तोडून घरातील शेतकरी कुटुंबातील व्यक्तीला मारहाण करत घरात प्रवेश करुन सोन्याचांदीच्या दागिन्यांसह नगदी रोकड असा एकूण पाच लाख सत्तर हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना बुधवार दि. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी दीडच्या सुमारास गेवराई तालुक्यातील सुशी येथे घडली. याप्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, गेवराई तालुक्यातील सुशी येथील शेतकरी दिलीप निवृत्ती पौळ यांच्या पत्नी वृंदावणी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बुधवार दि.१५ ऑक्टोबर २०२५



रोजी रात्री दीडच्या सुमारास आम्ही घरात असताना अज्ञात चोरट्यांनी घराचे लोखंडी गेटचे कुलूप तोडून घरामध्ये प्रवेश करत मला व माझ्या



पतीला जबर मारहाण करुन जबरदस्तीने घरात ठेवलेल्या लोखंडी पेटीतील सोन्याचे एकुण वजन ०९ तोळे ०८ ग्रॅम दागिने व १४ भार चांदीचे दोन चैन जोड असे सोन्याचांदीच्या दागिन्यांसह नगदी रोकड असा एकुण अंदाजीत पाच लाख सत्तर हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे. दरम्यान चोरट्यांनी रोख रक्कम व दागिने घेवून रिकाम्या पेट्या गावाजवळ असलेल्या शेतात टाकून दिल्या. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गु.र.नं. व कलम ६१६/२०२५ कलम ३०९(६) भा. न्या. स. नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून घटनेचा पुढील तपास गेवराई ठाण्याचे पो.नि.प्रविण बांगर , स.पो.नि.संतोष जंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उ.नि.आढाव व त्यांचे सहकारी पोलीस हे करत आहेत.

# चंद्रकांत पंडित क्रिकेट क्लिनिक आणि एमएसएसएफ ट्रस्टतर्फे आयोजन



मुंबई, 17 ऑक्टोबर 2025 :मुंबईतील युवा क्रिकेटपटूंना मोठ्या व्यासपीठावर चमक दाखविण्याची आणि राज्यस्तरीय क्रिकेट संघांपर्यंत पोहोचण्याची सुवर्णसंधी देणाऱ्या 24 व्या द्रोणाचार्य रमाकांत आचरेकर स्मृती निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेला आजपासून उत्साहपूर्ण सुरुवात झाली. मुंबईतील प्रतिष्ठित पी. जे. हिंदू जिमखाना मैदानावर या स्पर्धेचे भव्य उद्घाटन मुंबई क्रिकेट संघटनेचे (MCA) अध्यक्ष श्री. अजिंक्य नाईक यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आले. ही स्पर्धा चंद्रकांत पंडित क्रिकेट क्लिनिक (CPCC) यांच्या वतीने आयोजित करण्यात आली असून, तिचे संचालन एमएसएसएफ ट्रस्ट करत आहे. मुंबई क्रिकेट क्षेत्रात या स्पर्धेला विशेष मान आहे कारण ती मुंबई क्रिकेट संघटनेच्या 14 वर्षाखालील मुलांच्या निवड चाचणी म्हणून ओळखली जाते. अनेक तरुण खेळाडूंनी याच स्पर्धेतून आपला क्रिकेट प्रवास सुरू करून राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आपली छाप सोडली आहे.

# राज्यात काँग्रेसला पुन्हा मोठा धक्का,



लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात महाविकास आघाडीला मोठं यश मिळालं होतं. महायुतीच्या अनेक दिग्गज उमेदवारांचा पराभव झाला, मात्र त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने जोरदार

मुसंडी मारली, लोकसभेमध्ये मिळालेलं यश महाविकास आघाडीला विधानसभा निवडणुकीत टिकवता आलं नाही, विधानसभेमध्ये महाविकास आघाडीचा मोठा पराभव झाला, महाविकास आघाडीमधील घटक पक्ष असलेल्या काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांना अवघ्या ५० जागांवरच समाधान मानावं लागलं. तर दुसरीकडे राज्यात महायुतीच्या तब्बल २३२ जागा आल्या, भाजप हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला.

दरम्यान विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर महाविकास आघाडीमधून माहायुतीमध्ये जोरदार इनकमिंग सुरू झालं, अनेक बड्या नेत्यांनी या काळात महायुतीमध्ये प्रवेश केला. सर्वाधिक प्रवेश हे शिवसेना ठाकरे गटातून भाजप आणि शिवसेना शिंदे गटात झाले. तर दुसरीकडे याचा फटका हा काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाला देखील बसला आहे. आता मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे काँग्रेसला आणखी एक धक्का बसण्याची शक्यता आहे.

# दिवाळीच्या पहिल्याच दिवशी लाईटीचा लपंडाव

## पाटोदा महावितरणच्या कामकाजावर पाटोदेकर नाराज!

पाटोदा *(प्रतिनिधी)*दिवाळीच्या आनंदी वातावरणातच पाटोदा शहर व परिसरात दिवाळीच्या पहिल्याच दिवशी वीजपुरवठ्याचा लपंडाव सुरू राहिल्याने व्यापारी वर्ग, सामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे. बाजारपेठेतील दिवाळीच्या खरेदीला शिखर असताना अचानक वीज गायब झाली. त्यामुळे दुकानदारांना अंधारात दिवे, सजावट आणि व्यवहार करणे कठीण झाले. काही भागात वारंवार वीज ये-जा होत राहिल्याने इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे नुकसान




झाल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून पुढे येत आहेत.महावितरणचे अधिकारी मात्र देखभाल आणि तांत्रिक अडचणींचे कारण सांगत आहेत. परंतु दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात सततचा वीजलपंडाव सहन न करता नागरिक सोशल मीडियावरून संताप व्यक्त करत आहेत."दिवाळी घरात अंधार, दुकानात अंधार मग महावितरणचं कामकाज कुठं?" असा प्रश्न पाटोदेकरांनी उपस्थित केला आहे. नागरिकांनी तातडीने नियमित आणि स्थिर वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे.


# माजलगाव बुखारी शाळा ते जामा मस्जिद रस्त्याच्या कामावर गंभीर प्रश्नचिन्ह

## नालीचे काम गायब? सखोल चौकशी व गुन्हे दाखल करण्याची मागणी

माजलगाव (प्रतिनिधी) — बुखारी शाळा ते जामा मस्जिद या मार्गावरील रस्ता व नाली कामाचे अंदाजपत्रक तयार करून त्या ठिकाणी विकासकामे करण्यात आली असल्याचा दावा करण्यात येत असला, तरी प्रत्यक्षात नालीचे काम झालेच नाही, अशी गंभीर तक्रार पुढे आली आहे. या संदर्भात महाराष्ट्र मुस्लिम युवक प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष मुस्ताक कुरेशी यांनी जिल्हाधिकारी बीड यांना ईमेलद्वारे तक्रार दाखल केली असून, या कामांची तात्काळ सखोल चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी केली आहे. तक्रारीनुसार, बुखारी शाळा ते जामा मस्जिद या रस्त्याचे अंदाजपत्रक तयार करताना रस्ता आणि नाली दोन्ही कामे समाविष्ट होती. मात्र प्रत्यक्ष कामात केवळ रस्ता तयार करण्यात आला असून नालीचे काम पूर्णपणे गायब झाले आहे. हे प्रकरण



अंदाजपत्रकातील अटी व शर्तींचे उल्लंघन असल्याचे नमूद करण्यात आले आहे. लोक इच्छा प्रतिनिधी फेरोज पठाण यांनीदेखील या कामाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, "नागरिकांच्या निधीचा अपव्यय होत आहे. अंदाजपत्रकाप्रमाणे काम झाले आहे का, याची तपासणी होणे गरजेचे आहे." मुस्ताक कुरेशी यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर योग्य चौकशी करून गुन्हे दाखल करण्यात आले नाहीत, तर लोकशाही मार्गाने विविध आंदोलनात्मक भूमिका घेण्यात येईल.




This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२ राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com